खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व तत्सम, निमवैद्यकीय तसेच परिचर्या अभ्यासक्रमाचे पदविका/पदवी/पदव्युत्तर नवीन महाविद्यालय सुरु करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणे यासाठी देण्यात येणा-या आवश्यकता प्रमाणपत्रासंबंधी सुधारित कार्यपध्दती व सक्षमता तपासणीसाठी "प्रस्ताव छाननी शुल्क" निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एमईडी २०१७/प्र.क्र. २१०/१७/शिक्षण १**

९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१
तारीख: २६ ऑक्टोबर, २०१७

**वाचा :-**

१. शासन निर्णय, क्रमांक एमईडी-१३९८/प्र.क्र.१८०/९८/शिक्षण१,दि. १० नोव्हेंबर १९९८
२. शासन निर्णय, क्रमांक एमईडी-१३०१/प्र.क्र.३३/२००१/शिक्षण-१, दि.१६ ऑगस्ट २००२
३. शासन निर्णय, क्रमांक एमईडी २०११/सीआर-७८०/११/शिक्षण-१, दि. १९ जानेवारी २०१२
४. शासन निर्णय, क्रमांक एनयुआर-२०११/सीआर-७७९/११/शिक्षण-१, दि. १९ जानेवारी २०१२

**प्रस्तावना :-**

खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व तत्सम, निमवैद्यकीय तसेच परिचर्या अभ्यासक्रमाचे पदविका/पदवी/पदव्युत्तर नवीन महाविद्यालय सुरु करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास मान्यता देताना शासनाकडून आवश्यकता प्रमाणपत्र देण्यात येते. प्रचलित कार्यपद्धतीनुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८च्या कलम ६४ नुसार प्राप्त शिफारशींवर उक्त अधिनियमाच्या कलम ६५नुसार शासनाद्वारे मान्यता दिली जाते. तद्नंतर विद्यापीठामार्फत संबंधित महाविद्यालयास संलग्नता देण्यात येते .ही तरतूद लक्षात घेता, राज्य शासनाकडे नवीन महाविद्यालये सुरु करण्यासाठी तसेच अस्तित्वात असलेल्या महाविद्यालतील विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्याच्या प्रस्तावांच्या सक्षमतेविषयी खात्री करुन घेणे आवश्यक आहे, म्हणून खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व तत्सम, निमवैद्यकीय तसेच परिचर्या अभ्यासक्रमाचे पदविका/पदवी/पदव्युत्तर नवीन महाविद्यालय सुरु करणे तसेच विद्यार्थी प्रवेश

क्षमतेते वाढ करण्यासाठी देण्यात येणा-या आवश्यकता प्रमाणपत्रासंबंधी अनुसरावयाची कार्यपद्धती व त्यासाठीचे प्रस्ताव छाननी शुल्क संदर्भ क्र .१ येथील शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आली होती.

२. तद्‌नंतर छाननी शुल्काच्या रकमेत संदर्भ क्र.२,३ व ४ येथील शासन निर्णयान्वये वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे. तथापि मागील ५ वर्षामध्ये आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या केंद्रिय परिषदांनी बदललेले निकष, आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रस्तावांची प्राप्त होणारी वाढती संख्या तसेच या प्रस्तावांच्या पडताळणीकामी आवश्यक असणारे मनुष्यबळ व इतर अनुषंगिक खर्च वाढत असल्याने छाननी शुल्कात वाढ करणे त्याचप्रमाणे शासनाकडून देण्यात येणाऱ्या आवश्यकता प्रमाणपत्रासंबंधी कार्यपध्दती सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार संदर्भाधीन सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन उक्त अभ्यासक्रमांचे प्रस्ताव छाननी शुल्क व आवश्यकता प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबतच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

## शासन निर्णय :-

खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व तत्सम, निमवैद्यकीय तसेच परिचर्या अभ्यासक्रमाचे पदविका/पदवी/पदव्युत्तर नवीन महाविद्यालय सुरु करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यासाठी मान्यता देताना शासनाकडून देण्यात येणा-या आवश्यकता प्रमाणपत्रासंबंधी अनुसरावयाची कार्यपद्धती व प्रस्ताव छाननी शुल्क यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

अ) प्रत्येक वर्षी ३१ ऑक्टोबर पूर्वी संस्थांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे अर्ज सादर करावा.(महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ मधील कलम ६४ (३))

आ) विद्यापीठाने प्रस्तावाची तपासणी करुन प्रकल्प अहवालासह व आपल्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह प्रस्ताव डिसेंबर अखेरीपर्यंत विद्याशाखा निहाय (वैद्यकीय तत्सम तसेच निमवैद्यकीय) शासनास सादर करावेत. (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ मधील कलम ६४ (४))

इ) ज्या संस्थांनी छाननी शुल्क विहित मुदतीत भरले असेल, त्यांचे निरीक्षण करण्याबाबत व महाविद्यालये सुरु करण्यासाठीची सक्षमता तपासण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई / संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई यांना शासनामार्फत कळविण्यात येईल.

ई) संचालकांनी विहित प्रश्नावलीनुसार संस्थेकडे नवीन महाविद्यालय/अभ्यासक्रम/ प्रवेशक्षमता वाढीसाठी आवश्यक सोयी सुविधा, शिक्षक व कर्मचारीवृंद, इमारत, यंत्रसामुग्री, निधी इत्यादी बाबी विहीत मानकाप्रमाणे उपलब्ध आहे किंवा कसे याविषयीची कसोशीने तपासणी करून

आपला अहवाल शासनाने कळविल्यापासून विहित केलेल्या मुदतीत वा एक महिन्याच्या आत शासनास आपल्या स्पष्ट शिफारशीसह सादर करावा.

उ) संचालकांची व विद्यापीठाची शिफारस विचारात घेऊन शासन आवश्यकता प्रमाणपत्राबाबत निर्णय घेईल.

ऊ) आवश्यकता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर संस्थेला आवश्यकतेनुसार केंद्र शासनाकडे, संबंधित केंद्रिय परिषदेकडे विहित नमुन्यात परिषदेच्या मान्यतेसाठी अर्ज सादर करता येईल.

२. खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व तत्सम, निमवैद्यकीय तसेच परिचर्या अभ्यासक्रमाचे पदविका/पदवी/पदव्युत्तर नवीन महाविद्यालय सुरु करणे तसेच विद्यार्थी प्रवेश क्षमतेते वाढ करण्यास पुढीलप्रमाणे प्रस्ताव छाननी शुल्क निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | सध्याचे छाननी शुल्क (एक रकमी)(ना परतावा) | सुधारित छाननी शुल्क (एक रकमी) (ना परतावा) | प्रत्येक त्रूटीपूर्ततेसाठी पुनर्छाननी शुल्क (एक रकमी) (ना परतावा) |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय | रु.५,००,०००/- | रु.१५,००,०००/- | रु.५,००,०००/- |
| २ | दंत | रु.३,५०,०००/- | रु.१०,००,०००/- | रु.३,००,०००/- |
| ३ | आयुर्वेद व युनानी | रु.३,००,०००/- | रु.१०,००,०००/- | रु.३,००,०००/- |
| ४ | होमिओपॅथी | रु. ३,००,०००/- | रु.१०,००,०००/- | रु.३,००,०००/- |
| ५ | परिचर्या (बी.एससी. नर्सिंग, पीबीबीएस्सी, एमएस्सी नर्सिंग) | रु.१,५०,०००/- | रु.५,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| ६ | भौतिकोपचार व व्यवसायोपचार शास्त्र | रु.१,५०,०००/- | रु.५,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| ७ | पदव्युत्तर अभ्यासक्रम (प्रति विषय) | रु.१,५०,०००/- | रु.५,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| ८ | जनरल नर्सिंग मिडवायफरी (GNM) व ऑक्झीलरी नर्सिंग मिडवायफरी (ANM) | रु.१,००,०००/- | रु.५,००,०००/- | रु.२,००,०००/- |

३. सदर प्रस्ताव छाननी शुल्क खालील लेखाशीर्षाखाली संबंधित संस्था ज्या जिल्हयातील आहे, त्या जिल्हयातील शासकीय कोषागारात /राष्ट्रीयीकृत बँकेत अथवा भारतीय रिझर्व बँकेत चलनाद्वारे भरणे आवश्यक राहील. तसेच याची सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची राहील .

<u>लेखाशीर्ष-</u>

**०२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**
**०३- वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन**
**१०५-विषम चिकित्सा**
**(०१) (०३) - इतर जमा**
**( ०२१०० ५४५)**

४. सदर प्रस्ताव छाननी शुल्क प्राथमिक अर्जाची तपासणी झाल्यावर शासनाने छाननी शुल्क भरणा करण्याबाबतचे पत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत भरणे बंधनकारक राहील. त्यानंतर शुल्क भरणा करण्यास रुपये ५०,०००/-(रुपये पन्नास हजार फक्त) इतके विलंब शुल्क आकारण्यात येईल. सदर शुल्क विलंब शुल्कासह स्विकारण्याची मुदत फक्त पुढील ३० दिवसांसाठी असेल. त्यानंतर सदर शासन पत्र आपोआप व्यपगत/रद्द होईल.

५. छाननी शुल्क भरल्यानंतर संस्थेने शासनाकडे व संचालनालयाकडे १५ दिवसांच्या आत सक्षमता तपासणी करणेबाबत छाननी शुल्क भरणा पावतीसह/पुराव्यासह अर्ज दाखल करणे आवश्यक राहील. (चलनाची मूळ प्रत शासनास व सत्यप्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण/ आयुष यांच्याकडे जमा करावी.) त्यानंतर सादर केल्यास त्यांच्या सक्षमता तपासणी करणेबाबत विचार केला जाणार नाही. तसेच शुल्क शासन जमा केले जाईल.

६. संस्थेने छाननी शुल्क भरणा केल्यानंतर व संचालनालयाकडे तसा अर्ज सादर केल्यानंतर ६० दिवसांच्या आत सक्षमता तपासणी समितीने सक्षमता तपासणी अहवाल संचालनालयास सादर करणे आवश्यक राहील. संचालनालयाने सक्षमता तपासणी समितीचा अहवाल स्वयंस्पष्ट शिफारशीसह तात्काळ शासनास सादर करावा.

७. संस्थेस प्रस्तावाच्या अनुषंगाने त्रूटी पूर्तता करण्याकरिता पुढील सहा महिन्यामध्ये एकूण कमाल दोन संधी देण्यात येतील.

८. शासनाने संस्थेस त्रूटीपूर्तता करण्यास मान्यता दिल्यास , संचालनालयाने सक्षमता तपासणी समितीमार्फत तपासणी करुन त्रूटीपूर्तता अहवाल स्वयंस्पष्ट शिफारशीसह शासनास सादर करावा .

९. उपरोक्त प्रमाणे निश्चित करण्यात आलेले " प्रस्ताव छाननी शुल्क" हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल .ज्या संस्थांनी महाविद्यालय सुरु करण्यासाठी विद्यापीठाकडून या अगोदर प्रस्ताव सादर केले असतील परंतु ज्यांना अद्यापि, आवश्यकता प्रमाणपत्र देण्यात आले नाही त्यांनाही आवश्यकता प्रमाणपत्राच्या कार्यपद्धतीसंबंधीचे सदरचे आदेश लागू राहतील.

१०. तसेच सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी प्रस्ताव छाननी शुल्क भरणा करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या (जुन्या दराप्रमाणे) पत्रांची मुदत, सदर आदेश लागू झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यासाठी राहील. तद्नंतर अशी सर्व पत्र रद्द समजण्यात येतील. त्यांना नवीन दरानुसार प्रस्ताव छाननी शुल्क भरण्याबाबत पत्र मिळण्यासाठी शासनास अर्ज करावा लागेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२६११३३५९८४१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra
Pralhad
Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, serialNumber=f0abc250c4d9be2b6b786fa7056a78c0298ba36e78a4582723738fdd3d550d44, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2017.10.26 16:46:58 +05'30'

**(सुरेन्द्र प्र. चानकर)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
७. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. अधिष्ठाता/ प्राचार्य सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
१०.सचिव (वै.शि.), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११.अवर सचिव(शिक्षण-२), वै.शि व औ.द्र. विभाग
१२.निवडनस्ती (शिक्षण-१).